महा मेट्रो

PUNE METRO

## ई. आय. बी (European Investment Bank) टीम यांचा पुणे मेट्रो कार्याची पाहणी दौरा



**पुणे, ३०.०१. २०२०, गुरुवार:** केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारची ५०-५० भागीदारी असलेले महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन मर्यादित ( महामेट्रो ) ,पुणे मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी करत आहेत . अंदाजे एकूण प्रकल्प खर्च ११४२० कोटी रुपये असेल . युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक ( ई आय बी) आणि ए एफ डी फ्रान्स या दोन फंडिंग एजन्सीकडून कर्ज घेतले जाणार आहे .

महामेट्रोला युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक (ई.आय.बी ) कडून एकूण ६०० दशलक्ष युरोचे कर्ज मिळणार असून त्यासंबंधी लक्झेंबर्ग व नवी दिल्ली येथे युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक आणि भारत सरकार (आर्थिक व्यवहावर विभाग) यांच्यात २०० दशलक्ष युरोसाठी आर्थिक करारावर स्वाक्षरी झाली आहे. ईआयबी आणि महामेट्रो दरम्यान या प्रकल्पाच्या आर्थिक करारावर स्वाक्षरी करण्यासाठी EIB चे अधिकारी भारत दौऱ्यावर आले आहेत. आणि दि. 31.01.2020 रोजी करारावर मुंबई येथे स्वाक्षरी करणार आहेत. ईआयबीच्या या निधीचा उपयोग नागरी कामांसाठी अर्थसहाय्य करण्यासाठी केला जाईल म्हणजेच भूमिगत पॅकेजेस, रिच 3 स्टेशनस, डेपो वर्क्स इ.




महामेट्रो पुणे प्रकप्लासाठी निधी पुरवण्यात येणारी ई. आय.बी. अधिकाऱ्यांची टीम ने दि. ३१।०१।२०२० रोजी , गुरुवारी पुणे येथील महामेट्रोच्या रिच ३ सिविल कोर्ट स्टेशन ते रामवाडी महामेट्रोचे प्राधान्य मार्ग (प्रायोरिटी सेक्शन) मर्गिका १ ची ही पाहणी केली तदनंतर कृषी महाविद्यालय शिवाजीनगर येथील भुयारी मार्गाचे आणि टी बी एम मशीनचे कार्यपणाली याची पाहणी केली . महामेट्रोच्या घोले रोड ऑफिस मध्ये महामेट्रो अधिकारी यांनी ई.आय बी टिम साठी महामेट्रो प्रकल्पाची प्रगती सादर केली आणि भविष्यातील योजनांबद्दल चर्चा केली. त्यानंतर श्री. अतुल गाडगीळ सर आणि महामेट्रो टीम ही ई.आय.बी. ला करणार आहे . आणि महामेट्रोचे प्राधान्य मार्ग (प्रायोरिटी सेक्शन) मर्गिका १ ची ही पाहणी करण्यात येणार आहे .

तसेच ३१.0१.२०२० , शुक्रवारी रोजी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित आणि ई. आय.बी. चे व्हाईस प्रेसिडेंट श्री . अँड्रयू मॅकडोवेल , श्रीमती मारिया शॉ बर्रागन यांच्या उपस्थित २०० दशलक्ष युरो ( १६००कोटी रुपये ) कर्जाच्या अंमलबजावणीसाठी संयुक्तिक करारावर सह्या करण्यात येणार आहे .आणि त्यानंतर मुंबई येथे महामेट्रो , भारतातील इतर मेट्रोचे पदाधिकारी आणि ई.आय.बी. यांच्यात एक चर्चा सत्राचे आयोजन केले आहे .

महामेट्रो पुणे प्रकल्पाचे काम हे जलद गतीने होत असुन मेट्रोच्या चारही मार्गिकांचे सिव्हिल वर्क हे ३७ ट्क्के पुर्ण झाले आहे. महामेट्रोच्या पुणे प्रकल्पासाठी फ़ायनांशियल क्लोझर प्राप्त झाले आहे असे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी सांगितले आहे . तसेच ई. आय. बीचे व्हाईस प्रेसिडेंट श्री . अँड्रयू मॅकडोवेल यांनी महामेट्रोच्या एकुन कामाबद्दल आणि प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले .

**महामेट्रोबद्दल :**

भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार दरम्यान जसेकी ५०:५० जेव्ही चे हे स्पेशल पर्पज व्हेईकल (एस पी व्ही ) निर्मित करण्यात आले आहे. सध्या महामेट्रो नागपूर आणि पुणे मेट्रोचे रेल प्रकल्प हाताळत आहेत. मेट्रो रेल्वे प्रणालीत मानाकांनाची कार्यक्षम ऊर्जा निर्मित करणे आणि या एकूणच विकासाने पुण्याच्या नागरिकांचे जीवनमान एकूणच उंचावले जाईल , त्याला आकर्षक झळाळी येइल . तसेच सोलार , हवा यांच्या रूपात हरित ऊर्जेचा पुरेपूर वापर करून घेतला जाईल.

**ईआयबी बद्दल :**

युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक ही युरोपियन युनियनची कर्ज देणारी एक संस्था आहे .ही संस्था अर्थव्यवस्थेस मदत करतात, रोजगार निर्माण करतात, गुणवत्तेला चालना देतात आणि विकसनशील देश आणि युरोपियन युनियनमधील लोकांचे जीवन सुधारण्यासाठी कार्यशील असतात . ईआयबी, इनोव्हेशन (नवीन कल्पना )आणि स्किल्स, छोटे व्यवसाय, पायाभूत सुविधा आणि हवामान आणि पर्यावरण यावर ही लक्ष केंद्रित करते. ईआयबीने वित्तपुरवठा केलेल्या जवळपास ९० टक्के प्रकल्प ईयू सदस्य देशांवर आधारित असले तरी ही बँक सुमारे १५० अन्य देशांत नॉन -ईयू साऊथ -ईस्टर्न युरोपियन देश, भूमध्यसागरी भागीदार देश, एसीपी देश, आशियाई आणि लॅटिन अमेरिकन देशांमध्ये प्रकल्प राबवत असते. 1958 मध्ये रोमचा तह अस्तित्त्वात आला होता तेव्हा युरोपियन गुंतवणूक बँकेची स्थापना ब्रसेल्समध्ये झाली होती . ईआयबीची स्थापना 1958 मध्ये झाली होती. ईआयबीच्या कर्मचाऱ्यांची १०,००० हून अधिक सदस्य होते, ही संख्या २०१२ पर्यंत जवळपास दुप्पट झाली होती.



The EIB team visited the Metro site in reach 3 at Ram wadi Station and underground tunnel boring work at agriculture College grounds. The EIB team did enquiry about the relief and rehabilitation work. Also enquired about compensation provided by Metro, where they have acquired land and about the fair compensation given to the land owners. MahaMetro officials informed that all land parcels were taken with direct purchase and compensation given as per relief and rehabilitation policy of government of Maharashtra. MahaMetro officials also informed at Pune we have transplanted more than 1400 trees and also planted more than 14,000 news trees at different location in the Pune city and the survival rate of transplanted trees is very high. The EIB team headed by Mr Andrew McDowell, VP, EIB satisfied about the 600 m tunnel work in less than two months time. The EIB team enquires about the facilities for women's and physically challenged in metro coaches. MahaMetro officials informed about the special ladies coach in each train and earmarked seats for Divyang, expecting mother's and wheel chair bound passengers.
The EIB team satisfies about the overall 37% work completion by Pune metro in record 30 months time.